| MHKO100004092008 | **नियमीत दिवाणी दावा क्र. ९२/२००८** <br> रामू धडाम (मयत वारस) वगैरे. <br> // विरुध्द// <br> भिमा उर्फ भिमराव पाटील (मयत वारस) वगैरे. |
| --- | --- |

## निशाणी क्र.१०७ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.४ब यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होणेसाठी व दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे.

०२. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.४ब अशोक उर्फ शरद कृष्णा चौगुले हे दिनांक ०१/०३/२०१८ रोजी व प्रतिवादी क्र.४क केदारी कृष्णा चौगुले हे दिनांक १५/०५/२०१६ मयत झाले आहेत. वादी यांना वारस अभिलेखावर आणावे लागतात याची माहिती नव्हती. तथापि, वादी हे कामानिमित्य वेगवेगळया ठिकाणी असतात. प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.४ब व ४क हे मयत झालेबाबत प्रस्तुत कामी पुरसीस दाखल न केलेमुळे त्याबाबत वादी यांना माहिती मिळाली नाही. दरम्यानचे काळात कोरोना महामारीमुळे काही काळ न्यायालयीन कामकाज बंद होते. तसेच, वाहतुकीचे कोणतेही दळणवळणाचे साधन उपलब्ध न झालेने वादी यांना मयत वारसांची माहिती घेऊन वकीलांना देता आले नाही. त्यामुळे, त्यांना मयतांचे मृत्यू दाखले वेळेत मिळवता आले नाहीत. प्रतिवादी क्र.४ब व ४क यांचे वारसांना अभिलेखावर आणलेमुळे प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. तसे न झाल्यास वादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, वादी यांनी त्यांचेविरुध्द झालेला दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करुन वारस अभिलेखावर आणण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मागितलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास नि.१०९ येथे म्हणणे दिले व असे कथन केले की, अर्जातील सर्व कारणे चुकीची व खोटी आहेत. वादी यांनी विलंबाचे कोणतेही योग्य कारण दिलेले नाही. विलंबाच्या प्रत्येक दिवसाचे कारण अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. वादी यांनी यापूर्वी याच कामात मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणले आहेत, त्यामुळे वादी यांना वारस अभिलेखावर आणावे लागतात याची माहिती

होती. प्रस्तुत प्रतिवादी हे सन २०१८ व २०१६ रोजी मयत झाले आहेत. तेव्हा कोरोना महामारी नव्हती. प्रस्तुत दावा हा सन २००८ सालचा आहे. सबब, प्रतिवादी यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द फिल्ड होऊन स्वतंत्र तुटक कब्जासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, वादी क्र.४ब अशोक उर्फ शरद कृष्णा चौगुले हे दिनांक ०१/०३/२०१८ रोजी व वादी क्र.४क केदारी कृष्णा चौगुले हे दिनांक १५/०५/२०१६ रोजी मयत झालेले आहेत व सदरचा अर्ज हा दिनांक २०/१०/२०२२ रोजी दाखल केलेला आहे मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टिकल १२० प्रमाणे वादीने, प्रतिवादीच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसामध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत प्रतिवादी विरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, वादी यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत वादी यांनी मुदतीचे अधिनियम १९६३ चे कलम ५ प्रमाणे संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. वादी यांचे असे कथन आहे की, वादी हे कामानिमित्त वेगवेगळया ठिकाणी असतात. प्रतिवादी यांनी वादी क्र.४ब व ४क हे मयत झालेबाबत प्रस्तुत कामी पुरसीस दाखल न केलेमुळे त्याबाबत वादी यांना माहिती मिळाली नाही. दरम्यानचे काळात कोरोना महामारीमुळे काही काळ न्यायालयीन कामकाज बंद होते. तसेच, वाहतुकीचे कोणतेही दळणवळणाचे साधन उपलब्ध न झालेने वादी यांना मयत वारसांची माहिती घेऊन वकीलांना देता आली नाही. त्यामुळे, त्यांना मुदतीत अर्ज दाखल करता आलेला नाही असे कारण नमुद केलेले आहे. सदर कारण व विलंबाचा काळ पाहता वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक कारण नाही. परंतु, प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता वादी क्र.४ब व ४क यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत वादी यांचेवर अर्जाचा खर्च

ठेवून त्याची भरपाई प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. वादी क्र.४ब हे दिनांक ०१/०३/२०१८ रोजी व वादी क्र.४क हे दिनांक १५/०५/२०१६ रोजी मयत झालेले असुन प्रस्तुतचा अर्ज ब-याच विलंबाने दाखल केलेला आहे, त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.४,०००/- खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१. अर्ज रक्कम रु. ४,०००/- (रुपये चार हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

०२. वादी क्र.४ब व ४क चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2022.11.23 17:53:51 +0530

**( एस.ए.राठोड )**
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २२/११/२०२२.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 22/11/2022 |
| Order signed by P.O. on | 22/11/2022 |
| Order uploaded on | 23/11/2022 |